| MHRT030016942018 | प्रज्ञा रामचंद्र कदम<br>पूर्वाश्रमीची अष्टमी लक्ष्मण पवार व इतर<br>वि.<br>रामचंद्र अर्जुन कदम व इतर |
|---|---|

## निशाणी ४७ वरील आदेश
## दिनांक २४.०४.२०२६

प्रस्तुत अर्ज हा सामनेवाला यांचेतर्फे दाखल करण्यात आलेला असून, अर्जदार (आई) हिने त्यांच्या अल्पवयीन मुलीला न्यायालयाच्या आवारात अर्जदाराच्या अनुपस्थितीत काही काळ वडिलांसोबत वेळ घालवण्यास सहकार्य करावे, अशा स्वरूपाचा आदेश देण्यात यावा, ही प्रमुख मागणी आहे.

२. अर्जातील संक्षिप्त कथन असे की, या न्यायालयाने यापूर्वी दिलेल्या आदेशान्वये अल्पवयीन मुलगी कु.रुची हिला तिच्या वडिलांना भेटण्याची व त्यांच्यासमवेत वेळ व्यतीत करण्याची मुभा देण्यात आलेली आहे, जेणेकरून तिची वडिलांशी ओळख प्रस्थापित होऊन भावनिक नाते दृढ होईल. तथापि, अर्जदार ही सदर आदेशाचे योग्य प्रकारे पालन करीत नसून, मुलीस भेटीस आणताना आवश्यक ते सहकार्य करीत नाही, तसेच भेटीदरम्यान मुलीस मोबाईल देऊन तिचे लक्ष विचलित करते, ज्यामुळे सामनेवाला यांना मुलीसोबत सुसंवाद साधणे कठीण होते, असे आरोप

.... २ .......

करण्यात आले आहेत. त्या अनुषंगाने, अर्जदाराच्या अनुपस्थितीत न्यायालयीन आवारात मुलीसोबत वेळ घालवण्यास परवानगी देण्यात यावी, अशी विनंती करण्यात आलेली आहे.

३. सदर अर्जास अर्जदारातर्फे हरकत घेण्यात आलेली असून, प्रस्तुत अर्ज हा कोणत्याही विधिसंमत तरतुदीखाली ग्राह्य धरण्याजोगा नसल्याचा युक्तिवाद करण्यात आला आहे. तसेच, अर्जदारास सक्तीने “सहकार्य करण्याचा” आदेश देणे हे तिच्या घटनात्मक व वैयक्तिक स्वातंत्र्यावर अतिक्रमण करणारे असल्याचे नमूद करून अर्ज नामंजूर करण्याची विनंती करण्यात आली. अर्जदारातर्फे मांडण्यात आलेला विधिज्ञांचा युक्तिवाद विचारात घेण्यात आला आहे.

४. सामनेवालातर्फे विधिज्ञांनी नि.क्र.७९ वर पुरशिस सादर करून त्यांचा युक्तिवाद ऐकला असे गृहित धरण्यात यावे, अशी विनंती केली असून, त्याची नोंद घेण्यात येते.

५. अभिलेखाचे परीक्षण केले असता असे दिसून येते की, दि.२३/११/२०२१ रोजी नि.क्र.२४ वरील आदेशान्वये या न्यायालयाने अर्जदारास निर्देश दिले होते की, तिने अल्पवयीन मुलगी कु.रुची हिला सामनेवाला यांना भेटण्यास आणावे व त्यांना भेटण्याची मुभा द्यावी. तसेच, भेटीचे ठिकाण परस्पर सोयीप्रमाणे निश्चित करण्याचेही निर्देश देण्यात आले होते. प्रस्तुत अर्जामध्ये करण्यात

आलेल्या आरोपांना पुष्टी देणारा कोणताही ठोस व विश्वसनीय पुरावा अभिलेखावर उपलब्ध नाही. कोणत्या विशिष्ट तारखेस किंवा प्रसंगी अर्जदाराने न्यायालयीन आदेशाचे उल्लंघन केले, याबाबत कोणतीही स्पष्ट नोंद, तक्रार किंवा शपथपत्र सादर करण्यात आलेले नाही. त्यामुळे केवळ सर्वसाधारण आरोपांच्या आधारे न्यायालयाने विद्यमान आदेशामध्ये बदल करणे अथवा अतिरिक्त अटी लादणे उचित ठरणार नाही.

६. कौटुंबिक स्वरूपाच्या प्रकरणांमध्ये न्यायालयाचा प्रमुख विचार हा अल्पवयीन मुलाच्या सर्वोत्तम हिताचा (welfare of the child) असतो. त्या अनुषंगाने, विद्यमान व्यवस्थेमध्ये हस्तक्षेप करण्यासाठी ठोस, विश्वासार्ह व प्रथमदर्शनी पुराव्याची आवश्यकता असते. प्रस्तुत प्रकरणात असा कोणताही पुरावा अभिलेखावर उपलब्ध नसल्यामुळे, सामनेवाला यांची मागणी मान्य करण्यास कोणतेही संयुक्तिक कारण दिसून येत नाही.

७. याशिवाय, प्रस्तुत अर्ज दि.२५/०४/२०२३ पासून प्रलंबित असून, त्याच्या प्रभावी पाठपुराव्याचा अभाव स्पष्टपणे दिसून येतो. अंतिम युक्तिवाद सादर करण्याऐवजी “युक्तिवाद ऐकला असे गृहित धरण्यात यावे” अशी विनंती करण्यात आलेली आहे, यावरून अर्ज चालविण्याबाबतची आवश्यक तत्परता व गांभीर्य दिसून येत नाही. ही बाब देखील अर्जातील मागणीच्या विश्वासार्हतेवर परिणाम करणारी आहे.

८. वरील सर्व बाबींचा सखोल विचार करता, प्रस्तुत अर्ज हा कोणत्याही ठोस व सबळ कारणाविना तसेच आवश्यक पुराव्याच्या अभावात दाखल करण्यात आलेला असल्याने, तो मंजूर करण्यास कोणताही कायदेशीर आधार आढळत नाही. परिणामी, प्रस्तुत अर्ज नामंजूर होण्यास पात्र आहे.

**आदेश**

अर्ज नामंजुर करण्यात येतो.

SHABNAM YUNUS SHAIKH
Digitally signed by SHABNAM YUNUS SHAIKH
Date: 2026.04.24 17:31:10 +0530

**(शबनम युनुस शेख)**

**ठिकाण – रत्नागिरी.** **प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.२,**

**दिनांक – २४.०४.२०२६.** **रत्नागिरी.**

**प्रमाणपत्र**

''मी कथन करतो की,पी.डी.एफ. फाईल मधील न्यायनिर्णय हे मूळ न्यायनिर्णयाप्रमाणे शब्दशः बरोबर आहे''.

लिपीकाचे नाव :– एस.एन.कुलकर्णी

पी.डी.एफ दिनांक :–दि. २४.०४.२०२६

सांक्षाकित/–

लिपीक

.... .......